## ''लोकांचे अन्न सार्वभौमत्व :

वातावरणातील बदलाचा जल, जंगल, जमीन आणि जैव-विविधता यावर होणारा परिणाम''

औरंगाबाद चर्चासत्र सामुहिक संकल्प : २४-२५ नोव्हेंबर २०१२

दिनांक २४-२५ नोव्हेंबर २०१२ रोजी औरंगाबाद येथे वातावरणातील बदलाचा जल, जंगल, जमीन आणि जैव-विविधता यावर होणारा परिणाम'' या विषयावरील महाराष्ट्रव्यापी चर्चासत्रात विविध, संस्था, संघटना, शाश्वत-जैविक-सेंद्रिय शेती अनुभवी कृषीभुषण-जज्ञ, संशोधक-अभ्यासक, जमीन-पाणी-जंगल-नदी-पारंपारिक गांवरान वाण जोपासणारे ९४ स्त्रि-पुरुष शेतकरी, युवक आणि सामाजिक चळवळी सहभागी झाल्या होत्या. आपापल्या भगातील स्थानिक प्रश्न आणि साऱ्या विश्वाला भेडसावणाऱ्या ''पृथ्वीचे वाढते तापमान आणि वातावरणातील बदल'' यामधील थेट संबंध अनुभव आणि ज्ञान यांमध्ये सांगड घालत समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यावेळी औरंगाबाद-लातूर जिल्ह्यातील अनेक भिल्ल-ठाकर आदिवासी-दलित आणि भटक्या-दलित आणि भटक्या-विमुक्त समाजातील शेतकरी स्त्री-पुरुषांनी जोपासलेल्या मन्याड-गोदावरी नदी खोरे आणि जंगल, म्हैसमाळ-गौताळा अभयारण्य आणि सोयगांव तालुक्यातील डोंगर कपारीतील गांवातील ऊसवड बाजरी, दगडी आणि बेदरी ज्वारी, घुंगरु भुईमुग, हावरी, मुग, मठ, तूर, कांदा, भेंडी, भोपळा आदी १८ गांवरान अस्सल बि-बियाण्यांच्या वाणांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

या चर्चासत्राला महाष्ट्रातील सेंद्रिय शेती आणि प्रक्रिया उद्योग आणि त्यासाठीच्या बाजारपेठा काम करणाऱ्या १४ संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

दुसऱ्या दिवसाच्या चर्चासत्रात औरंगाबाद कृषी अधिक्षक श्री.डी.आय.गायकवाड, महाराष्ट्र शसनाच्या सेंद्रिय कृषीभूषण पुरस्कार प्राप्त कार्यकर्त्या वसुधा सरदार (दौंड) महिला रोग जज्ञ व सजग महिला संघर्ष समितीच्या डॉ.रश्मी बोरीकर, शिक्षणतज्ञ डॉ.यशवीर कवडे, लोकपंचायतचे सारंग पांडे (संगमनेर), गांडूळ निर्मिती प्रकल्प प्रमुख साहेबराव भांड, पाणी सहकारी संघाचे सचिव नामदेवराव माळी (शिरुर), पाणी तज्ञ डॉ.प्रदिप पुरंदरे, अर्थशास्त्रज्ञ प्रा.एच.एम.देसरडा,''प्रगति''चे डॉ.एम.आय.सोनी, विकास अध्ययन केंद्र सेचालक सुरेश शेळके यांनी आपले अनुभव व विचार मांडले. आशा केंद्र-पुणतांबा कला मंचने सामाजिक चळवळीची गाणी गायली. विकास अध्ययन केंद्र-मुंबई, कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट-पुणतांबा, आणि लोकपर्याय-औरंगाबाद यांनी संयुक्तपणे आयोजित चर्चासत्रात सर्व सहमतीने ''सामूहिक संकल्प औरंगाबाद २०१२'' करण्यात आला.

## सामूहिक संकल्प - औरंगाबाद २०१२

याच विषयावरील हैद्राबाद, लखनौ येथील चर्चासत्रांमधून पुढे आलेल्या ''पिपल्स अलायन्स फॉर बायो-रिजनल फुड सॉव्हरंटी'' (विभगीय जैविक अन्न सार्वभौमत्वासाठी जन आघाडी) या व्यासपीठामध्ये आम्ही जोडून घेत आहोत. यातून भरतभर जैविक-सेंद्रिय शाश्वत शेतीला प्रोत्साहन मिळेल हा आशावाद जाहिर करीत आहोत.

रासायनिक शेतीमुळे प्रदुषणाचे प्रश्न दिसवेंदिवस वाढतच आहेत. अन्न, पाणी आणि वायु हे सजीव सृष्टीचे मुलाधार आहेत. याआधुनिक जीवनशैलीमुळे आणि तसेच कृषी पद्धतीमुळे या मुलाधारावरच घाला घातला गेला आहे. यामुळेच संपूर्ण सृष्टीचे संतुलनच बिघडले आहे. वातावरणातील बदलामुळे त्यात अधिकच भर पडली आहे. किटकनाशक आणि तणनाशकांमुळे मधमाशा, पक्षी, मित्रकिडे, गांडूळ, जमिनीतील सुक्ष्मजीव इत्यादी सजीवांवर अत्यंत प्रतिकूल परिणाम होत आहे. परिणामी जैवविविधता धोक्यात आली; तापमानवाढ आणि रोगजंतुमुळे नव्हे तर जीवन शैलीमुळे होणारे कर्करोग, मधुमेह. रक्तदाब, हृदरोग आणि पक्षाघात हे आजार बळावत आहेत.याचे सर्वात जास्त परिणाम स्त्रिया आणि मुलांवर होत आहेत. कृषी मालाच्या दर एकरी उत्पादनातही सतत घट होत आहे. याउलट चित्र सेंद्रिय शेतीचे आहे.

सेंद्रिय शेती पद्धतीमध्ये सृष्टीचे संतुलन साधण्याचे सामर्थ्य आहे. प्रदुषणमुक्त, आरोग्यदायी आहार आणि पर्यावरण संतुलन या पद्धतीव्दारा ते शक्य आहे. ती नुसती शेती-पद्धती नसून त्यात संवर्धनाचा विचार केंद्रस्थानी आहे. तेथे व्यापाराला स्थान नसून परस्परांच्या गरजापूर्तींचा, परस्पर सहकार्याचा विचार प्रधान आहे. तेथे शोषण नाही. सहकार्याची भावना, विचार प्रधान आहे. शेती मुळातच संकृती आहे (त्याला उद्योग म्हणून संबोधणे घोडचूक होईल) शेतकऱ्यांच्या कुटुंबाचे कुत्रा, मांजर, गायी-गुरे सदस्य आहेत. आज त्यांची जागा मोठमोठ्या बाहुल्या, टी.व्ही.आणि ट्रक्टर-हार्वेस्टर सारखी यंत्र सामुग्री घेत आहे. त्यामुळे महिलांची शेतीमधून हाकलपटी होणार आहे. तसेच देश अमेरिका (स्वयंघोषित जागतिक पोलिस) आणि अन्य साम्राज्यवादी शक्तींच्या हातचे बाहुले बनण्याचा धोका निर्माण झाला आहे. जनुकीय परिवर्तीत बियाणे (जी.एम./बी.टी.) बियाणे भारतात पसरविण्यासाठी मोनसँटो कंपनीच्य भारतातील कारवाया, सत्ताधारी आणि अन्य राजकीय पक्षाची त्यांना असलेली अनुकूलता जी.एम.बियाण्यांचा भारतातील प्रवेश सुकर होण्यासाठी BRAI (Bio Regulatory Authority of India) विधेयक संसद अधिवेशनाच्या पटलावर दाखल होणे, १२ व्या पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्राच्या यांत्रिकीकरणावर दिलेला भर इत्यादी पाहता शेती व्यवसाय बहुराष्ट्रीय कंपन्या आणि स्थानिक धनदांडग्यांच्या नियंत्राणात जाण्याची चिन्हे आहेत.

यामुळे शेतकरी संपण्याचा धोका संभवतो. भारतीय कृषी क्षेत्रावरील बहुराष्ट्रीय कंपन्यांची पकड वाढल्यास सर्वत्र एकजातीय (गहू, मका, सोयाबीन) पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड होईल. त्यामुळे शेतीतील जैव विविधता संपुष्टात येईल. अंतिमतः याचा परिणाम अपल्या स्वयंपाकघरातही दिसेल आणि भोजनातील जैवविविधता संपुष्टात येईल. हे सगळं थोपवायचं असेल तर शेती व्यवसाय पूर्णपणे स्वावलंबी झाला पाहिजे. सेंद्रीय शेतीतून ते शक्य आहे.

सेंद्रीय शेतमालाच्या निर्यातीसाठी गेल्या पाच-दहा वर्षांपासून शासनाच्या काही यंत्रणा राबत आहेत. द्राक्ष, संत्रा, बासमती तांदूळ, मसाला पिके, सुका मेवा इत्यादी शेतमालाची निर्यात करुन परकीय चलन मिळविण्याचा खटाटोप शासन आणि सधन शेतकरी करित

आहेत. त्यातून येणारी समृद्धी पर्यावरणस्नेही असेल काय? तो पैसा तळागळापर्यंत झिरपेल काय? अंतिम माणूस याचा लाभार्थी असू शकेल काय? उत्तरं नकारार्थीच येतात.

मुळात आजची बाजार व्यवस्था शोषणावर आधारित आहे. त्यात 'सेवा' करण्याचा फक्त देखावा आहे म्हणून बाजार व्यवस्थेच्या सोनेरी सापळयात न भुलता गांव समुदायाने, स्वावलंब शेती पद्धतीची कास धरणेच श्रेयस्कर ठरते.

शेतीचे नियोजन गरजाआधारित असावे. अन्न, वस्त्र, निवारा, शुद्ध पेयजल, पर्यावरणाची शुद्धता या विषयाला गावसमुदायाने अग्रक्रम दिल्यास गावाचे गोकूळ शक्य आहे. असा उपक्रम संपूर्ण गावाने एकत्रीत बसून सर्वसंमतीने राबविल्यास ते गांव सर्वांसाठी पथदर्शक ठरेल.

## सामूहिक संकल्प

१) **जैवभार :** शेतातील पिकांचे अवशेष, पालापाचोळा इत्यादींपासून जमिनीला खत आणि आच्छादन मिळते. म्हणून शेतात आगपेटी वापरणे बंद करावे. काहीही पेटवायचे नाही हा पहिला संकल्प असावा.

२) **माती अडवा पाणी जिरवा :** आपआपले शेत पाणलोट क्षेत्र समजून त्याची बांधबंदिस्ती अचूक करावी. समोच्च पातळी (कंटूर) बांध (कंटूर बंड) आणि त्याला समांतर पेरणी केल्याने मृदाजल संवर्धन होऊन वनस्पतीची वाढ आवर्षण काहातही उत्तम होते.

मृदा संरक्षणाशिवाय जमिनीची सुपिकता टिकू, वाढू शकत नाही. म्हणून 'माती आडवा' हे काम शेतात प्रथम व्हावे. ते केले की शेतात पाऊस मुरण्यासही मदत होईल.

पाणी आडवण्याचे वेगळे उपक्रम शेताच्या बाहेर ओहोळ, नाल्यांमध्ये बांध घालून करणे ही दुसरी पायरी आहे. पाहिली पायरी शेतातील उपचाराची. तिला नाकारु नये, शेताचे तुकडे होतात म्हणून शेतकरी कंटूर बांधबंदिस्ती नाकारतात; ते आत्मघातकी आहे.

३) **शेतीला वृक्षाची जोड द्यावी :** विविध फळझाडे तसेच चारा, लाकूडफाटा, पक्षांना निवारा देणारे, पर्यावरण संवर्धनास भरीव हातभार लावणारी वड, पिंपळ, कडूलिंब, मोह, आंबा, रोहण, चिंच, शिंदी, कवठ, बाभूळ, करवंद, साग, सिवन, बांबू इत्यादी आपल्या शेतात अवश्य लावावी. ही यादी बरीच वाढविता येईल.ही झाडे शेताच्या पश्चिम आणि उत्तरेला अवश्य लावावी, त्यातून वारारोधक भिंत तयार होईल.

४) **कमीतकमी मशागत :** खोल मशागतीमुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब आणि जीवजंतू नष्ट होतात. म्हणन ट्रॅक्टरची नांगरणी टाळावी. बैलांव्दारे मशागत सर्वोत्तम आहे. ट्रॅक्टर अपरिहार्य असल्यास नांगरणी ऐवजी वरवर मशागत करावी.

५) **मिश्र पिके घ्यावी :** एकदल, व्दिदलची मिश्र पिके घ्यावीत.

६) **भरड धान्य :** बाजरी, नाचणी, भगर, राळा, सावा, कोदू, कुटकी इ. आवश्यक पेरा. त्यातून भरपूर पोषण मिळते.

७) **तेल बिया :** घरच्या पुरत्या तेलबिया - तीळ, कारळा, भुईमूग, जवस, करडी अवश्य पेरा.

८) पाटा बियाणे : विविध भाजीपाला, नव्हाळीचे धान्य परिवारासाठी दोन-चार ओळीत पेरावे. यातून बीज संवर्धन आणि पोषक आहार मिळेल.

९) **नोंदी ठेवणे :** दैनंदिन निरिक्षणे, जमा-खर्च, तापमाण, आर्द्रता, पाऊस इत्यादींच्या नोंदी ठेवणे.

शेती संस्कृतीतील परस्पर-सहकार्यावर आधारित जुन्या आवड-सावड सारख्या पद्धतींचा अवलंब करणे.

**जंगल आणि नद्या वाचवा : लोक चळवळ झाली तरच मानवी सभ्यता टिकेल**

**नद्या वाचवा :** नद्या जीवनदायीनी आहेत. त्यांच्या काठाने मानवी संस्कृती फुलली. लाखो-करोडो लोकांचे मासेमारी, वाहतूक इत्यादी सारखे रोजगार आजही नद्यांवर लवलंबून आहे. आज देशभरातील लहानमोठ्या सर्वच नद्या गटारगंगा होत आहेत, यमुना नदी मृत होण्याच्या मार्गावर आहे, इतर नद्यांची परिस्थिती ही अत्यंत शोचनीय आहे. वाळू उपसा, उद्योगातील सांडपाण्यामुळे परिस्थिती भीषण होत आहे. शुद्ध, स्वच्छ पाण्याच्या वाहत्या नद्यांमुळे पेयजल आणि ओलीताच्या पाण्याची उपलब्धता सहज-सुलभ होते. वाहत्या नद्यांच्या काठावर विविध वृक्ष, वेली, वनौषधी बहरतात, पक्षी-प्राण्यांना आधिवास लाभतो. नद्या संपल्या तर ही संपूर्ण व्यवस्थाच कोलमडते. सर्वच नद्यांची आजची अवस्था अत्यंत बिकट आहे, त्यांना वाचविण्यासाठी त्वरीत कृती आवश्यक आहे.

**जंगलं :** लाकूड आणि खनिज निर्मितीचे कारखाने नव्हेत तर ती लाखो, करोडो प्रजातींच्या वनस्पती आणि जीवजंतूंना सांभाळणारी परिस्थितीकी (Ecosystem) आहे. जंगल उत्तम जलाशय आहे, पावसाचे पाणी साठविणारी ती अत्यंत कार्यक्षम व्यवस्था आहे.

बि-बियाणे बँकेचे उद्घाटन करताना जिल्हा कृषी अधिक्षक गायकवाड, सुरेश शेळके, वसुधाताई सरदार, डॉ.रश्मी बोरीकर आदी (छाया : शांताराम मगर, लोणी) मो. ९४२१४१७५४०